


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
dainiklokaarambh@gmail.com

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर


बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार २४ डिसेंबर २०२४ | अंक १५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

## अंबाजोगाईकराची अजब मागणी सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल

अंबाजोगाई ।न्युज जिल्हा करण्याची येथील खूप जुनी मागणी आहे. पण ही मागणी काही पूर्ण होत नाही. प्रत्येकाकडून केवळ आश्वासनाची खैरात केली जात आहे. यामुळे अंबाजोगाईकरांचे जिल्ह्याचे स्वप्न साकार होत नाही. यामुळे आता सोशल मीडियावर अजबच मागणी करण्यात आली आहे. याची जोरदार चर्चा सुरू आहे. अंबाजोगाई जिल्ह्याचे स्वप्न साकार करण्यासाठी अनेकदा आंदोलने झाली. यावेळी अनेक पुढाऱ्यांनी जिल्ह्याचे आश्वासन दिले पण जिल्हा कोणीही घोषित केला नाही. जवळपास १५ वर्षांपूर्वी स्व. विमलताई मुंदडा यांनी जिल्ह्याला लागणारी सर्व कार्यालय येथे करुन घेतली. त्या-त्या कार्यालयांच्या इमारती तयार करुन घेतल्या आता केवळ जिल्ह्याची घोषणा बाकी आहे. ही घोषणा काही होत नसल्याने आता अंबाजोगाईकरांनी सोशल मीडियावर अंबाजोगाई जिल्हा होत नसेल तर हा तालुका लातूर जिल्ह्याला जोडण्यात यावा अशी मागणी केली आहे. या मागणीला नेटकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. या मागणीची अंबाजोगाई तालुक्यात जोरदार चर्चा सुरू आहे.

## बळीराम पाटील कदम यांचे निधन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट




नायगाव : सोमठाणा ता.नायगाव येथील जेष्ठ नागरिक कै.बळीराम गणपत पाटील कदम (वय ७५ वर्षे) यांचे दि.२२-डिसेंबर रोजी शनिवारी दुपारी २ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर दि.२३-डिसेंबर रोजी दुपारी १ वाजता सोमठाणा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.कै.बळीराम पाटील कदम यांच्या पश्चात एक मुलगा तीन मुली नातू,पणतू असा मोठा परिवार असून प्रगतशील शेतकरी आनंद बळीराम पाटील कदम यांचे ते वडील होत.

## कारखेल परिसरात बिबट्याचा वावर
### नागरिकांमध्ये भितीचे वातावरण

आष्टी तालुक्यातील कारखेल खुर्द व चिंचेवाडी परिसरात बिबट्याचा वावर वाढल्यामुळे भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.दोन दिवसांपूर्वी कारखेल येथे बिबट्याने एका शेळीचा फडशा पाडला होता.या आधी वेलतुरी येथे काही दिवसांपूर्वी बिबट्याने शेळी मारल्याची घटना घडली होती. आता पुन्हा एकदा शेळी मारल्यामुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. कारखेल येथील शेतकरी रुपेश घुले यांच्या एका शेळीला बिबट्याने मारल्याने परिसरातील शेतकरी वर्ग भयभीत झाला आहे. वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा,अशी मागणी करूनही त्याकडे दुर्लक्ष केल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. मागील अनेक दिसांपासून बिबट्याचा कारखेल चिंचेवाडी अरणविहीरा वेलतूरी गंगादेवी गहुखेल परिसरात वावर असल्याचे अनेकांना दिसून आले.यामुळे नागरिकांमध्ये भितीचे सावट आहे.काही दिवसांपूर्वी बिबट्याने वेलतुरी येथे एका शेळीचा फडशा पाडला होता.तसेच परिसरात पाळीव प्राण्यांवर बिबट्याने थेट झेप घेत हल्लाही केला होता. त्यामुळे बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी अजित घुले प्रकाश घुले राजू घुले संजय चौधरी वसंत घुले यांनी केली आहे.

# बीडच्या घटनेमागील मास्टरमाइंड शोधणार
## माणुसकीला काळीमा फासणारी घटना-अजित पवार
### कोणतीही किंमत मोजावी लागली तरी चालेल

**बीड ,/प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यात माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली. या घटनेची न्यायालय आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येणार आहे. या घटनेमागील ‟मास्टरमाइंड”चा शोध घेतला जाईल. कोणीही असू द्या, त्यासाठी कोणतीही किंमत मोजावी लागली तरी चालेल, मुख्यमंत्र्यांसह आम्ही तिघांनी या प्रकरणात लक्ष घातलं आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड येथील घटनेबाबत इशारा दिला. बीड येथील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला. हिवाळी अधिवेशनातही या घटनेचे पडसाद उमटले. संतोष देशमुख यांची पत्नी आणि मुलगी या दोघींनीही आरोपींना कठोरातली कठोर शिक्षा द्या असं सांगितलं. सरकारने या प्रकरणी कुणाचीही गय केली जाणार नाही असं म्हटलं आहे. दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सिव्हिल सर्जनशी बोलल्यानंतर त्यांनी काय सांगितलं तो अनुभव कथन केला. बीड जिल्ह्यामध्ये एका सरपंचाची अत्यंत क्रूर हत्या करण्यात आली. माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना ठरली. तिथे मी त्यांच्या मुलीला, पत्नीला आणि कुटुंबियांना भेटण्यासाठी मी गेलो होतो. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत याबाबत भाष्य केलं. काहीही झालं तरी या मागे जो मास्टरमाईंड असेल त्याला सोडलं जाणार नाही. कुणीही मास्टरमाईंड असेल तरीही त्याला आम्ही कुणीही सोडणार नाही. आपण खपवून घेणार नाही. कुणालाही आपण

### सिव्हिल सर्जन मला म्हणाला


अजित पवार पुढे म्हणाले, आपण प्रत्येकाला मदत करण्यासाठी, प्रत्येकाला सन्मानाने जगता येईल यासाठी काम करतो आहोत. मी आज सिव्हिल सर्जनशी बोललो त्यांनी मला सांगितलं, दादा पोस्टमॉर्टेम करताना आजपर्यंत अशा प्रकारची केस मी आयुष्यात बघितली नाही. एखाद्या प्राण्यालाही काठी मारताना आपण म्हणतो जाऊ दे ना कशाला मारतो? अत्यंत अमानुषपणे संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली. शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्राला या गोष्टी शोभणाऱ्या नाहीत. आम्ही राज्यकर्ते म्हणून बसलो असताना या घटना आम्हालाही शरमेने मान खाली घालायला लावणाऱ्या आहेत. एका पद्धतीचा मेसेज राज्यात गेला पाहिजे की पुन्हा असं कुणी करायचं धाडस करता येता कामा नये. सगळ्या अमानुष लोकांना फाशीची शिक्षा झाल्याशिवाय आम्ही सोडणार नाही हे आम्ही ठरवलं आहे. असंही अजित पवार यांनी म्हटलं आहे. बारामतीत त्यांनी जे भाषण केलं त्या भाषणात अजित पवारांनी हे विधान केलं आहे.

भयभीतपणे जगतोय असं कोणलाही वाटता कामा नये. मी आज देखील तुम्हाला सांगतो आम्ही तिघांनीही यामध्ये लक्ष घातलेलं आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाबाबत अत्यंत व्यवस्थित उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिलं. न्यायालयाच्या मार्फतही चौकशी करण्यात येणार आहे तसंच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्फतही या हत्या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे. काहीही झालं तरीही मास्टरमाईंड तो कुणीही असला तरीही त्याला सोडणार नाही. मला आजही काही मित्रमंडळी भेटली त्यांनाही मी सांगितलं अशा कुठल्याही गोष्टी आपण खपवून घेणार नाही. असं अजित पवार म्हणाले.

## महाराष्ट्र संघात साक्षी शिंदे, अनुश्री स्वामी यांची निवड
### बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडून दोघींचे अभिनंदन

प्रतिनिधी बीड

दि.२३ : जळगाव येथे सुरु असलेल्या १९ वर्ष आतील निवड चाचणी स्पर्धेत १०० रनची खेळी करून निवड समितीचे लक्ष वेधले. साक्षी उत्कृष्ट उजव्या हाताने फलंदाजी करते. बीड संघाकडून खेळताना चमकदार कामगिरी साक्षीने केली आहे. साक्षीला अमित गोरे , मोहित परमार, माही परमार यांचे मार्गदर्शन लाभले. साक्षीला तिचे वडील भाऊसाहेब व आई वनमाला यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन २३ वर्ष वयाच्या मुलींच्या संघात बीडच्या अनुश्री स्वामी यांची निवड झाली असून पुणे याठिकाणी सुरु असलेल्या २३ वर्ष आतील निवड चाचणी स्पर्धेत ६२ आणि ३९ रनची खेळी करून निवड समितीचे लक्ष वेधले. अनुश्री उत्कृष्ट उजव्या हाताने फालदाजी करते अनुश्री लहानपणी पासून राकेश उबाळे





क्रिकेट अकॅडमी व अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमी याठिकाणी क्रिकेटचे प्रशिक्षण घेत आहे. अनुश्रीला राकेश उबाळे, मोहित परमार, माही परमार, स्वप्नील कोकाटे यांचे मार्गदर्शन लाभले. बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम, महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखुदे, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख मोहित परमार, माही परमार यांच्यावतीने अभिनंदन केले.

## राजर्षी शाहू कन्या विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड संचलित राजर्षी शाहू कन्या माध्यमिक विद्यालयाने उत्कृष्ट नियोजन करून दिनांक १४/ १२/२०२४ ते दिनांक १८/१२/२०२४ या कालावधीत विद्यालयाची शैक्षणिक सहल संपन्न झाली. या सहलीसाठी ८० विद्यार्थिनींना घेऊन बीड-नगर-पुणे-पनवेल- मुंबई -गेट वे ऑफ इंडिया- राणीचा बाग- नेहरू तारांगण- मरीन ड्राईव्ह- हाजी अली दर्गा- वानखेडे स्टेडियम- मलबार हिल- विधान भवन -मंत्रालय- महालक्ष्मी मंदिर- अलिबाग- काशीद बीचजंजिरा- महाड -रायगड- पोलादपूर- प्रतापगड -महाबळेश्वर -वाई- प्रतिबालाजी- जेजुरी- मोरगाव गणपती- जामखेड -बीड यासारख्या ऐतिहासिक,भौगोलिक ,सागरी, सांस्कृतिक ,पर्यावरणीय व धार्मिक स्थळांना भेटी देऊन विद्यार्थिनींना त्या विषयाचे महत्त्व सांगण्यात आले. या विद्यालयाच्या ८० विद्यार्थिनींनी एसटी महामंडळाच्या लाल परीने गुलाबी थंडीत सुरक्षित प्रवास



करीत निसर्गरम्य ऐतिहासिक, पर्यटन व धार्मिक स्थळांना भेटी देऊन सहलीचा मनमुराद आनंद लुटला आहे. यामध्ये विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम. कदम एस.डी यांच्या मार्गदर्शनाखाली सहल प्रमुख श्री.जगताप एस .सी, झोडगे जी .एस व मुंडे एल . आर,सोंडगे के. बी , मातकर व्हि.डि,आगलावे एम. एच,श्रीम. नन्नवरे मॅडम यांनी सहकार्य केले. या सहलीच्या यशस्वीतेबद्दल संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील ,संस्थेचे सचिव प्रा.जे .पी शेळके यांच्यासह संस्थेचे सर्व संचालक मंडळ तसेच प्राथमिक विभागाचे प्र.मुख्याध्यापक राऊत आर. टी, राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीम.लोखंडे आर.डी यांनी अभिनंदन केले.

# सरपंच संतोष देशमुख यांच्या खुनातील प्रत्येक आरोपीला शिक्षा होईल
# देशमुख कुटुंबीयांच्या भविष्याची शासन हमी देत आहे
### बीड मधील गुन्हेगारी कायमस्वरूपी संपविणार...!-उद्योगमंत्री उदय सामंत यांची देशमुख कुटुंबीयांशी भेट





## सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ तसेच राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केले देशमुख कुटुंबीयांचे सात्वन

बीड दि. २३ :- मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणपणाने हत्या करण्यात आली, यातील एकही आरोपीला आम्ही सोडणार नाही अशी शासनाची भूमिका आहे हे सांगण्यासाठी व देशमुख कुटुंबीयांना शासन त्यांच्यासोबत खंबीरपणे आहे ही हमी देण्यासाठी उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांचा संदेश आपणास देत आहोत. शासन सर्वप्रथम तुमच्या सोबत आहे असे राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज देशमुख कुटुंबीयांचा सांत्वनाप्रसंगी सांगितले. उद्योग मंत्री यांच्यासोबतच राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट तसेच राज्यमंत्री मेघना साकोरे- बोर्डीकर यांनी आज या परिवाराच्या सांत्वनासाठी भेट दिली. यावेळी त्यांनी गावक-यांसोबत देखील चर्चा करून त्यांची म्हणणे ऐकून घेतले. या प्रकरणात असणारे मुख्य आरोपी तसेच त्यामागील सूत्रधार यांना आठवड्याभरात अटक करून कारवाई करण्यात येईल असे याप्रसंगी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी गावक-यांशी बोलताना सांगितले. श्री. शिरसाट यांनी आज येथे भेट देण्यापूर्वी बीड येथे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेऊन याप्रकरणी होत असलेल्या तपासाची माहिती घेतली. यावेळी देशमुख कुटुंबीयांनी चर्चा केल्यानंतर मंत्री उदय सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या प्रकरणी एसआयटी गठीत करण्यात आलेली असून न्यायालयीन चौकशी देखील करण्यात येत आहे, त्यामुळे या प्रकरणात लवकरात लवकर दोषीना शिक्षा व्हावी तसेच देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी आदेश दिले आहेत असेही ते म्हणाले. पंधरा वर्षे सार्वजनिक जीवनात राहून स्वतःचे साधे घरही न बांधणारे दिवंगत सरपंच देशमुख यांची गावाच्या विकासाची तळमळ त्यांच्या कामातून लक्षात येते व या पुढील काळातही



त्याच प्रकारचा विकास या गावात होईल याची खबरदारी शासन घेईल असे सामंत यांनी ग्रामस्थांशी चर्चा करताना सांगितले. याबाबत सातत्याने मागणी करणा-या राज्यातील सरपंच संघटनेच्या निवेदनाची दखल शासनाने घेतली आहे असेही उदय सामंत यावेळी म्हणाले. देशमुख यांच्या कुटुंबीयांना शिवसेनेतर्फे मदत देण्यात येईल असे सांगून सामंत यांनी देशमुख यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी देखील आम्ही घेत आहोत असे यावेळी सांगितले. जी घटना घडली ही अतिशय निंदनीय आहे याबाबत मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण तपासाचे निर्देश दिले आहेत त्यामुळे येणा-या काळात देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यास शासन कटीबद्ध आहे असे राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी यावेळी भेटीदरम्यान सांगितले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २४ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## संपादकीय

### दयेच्या अर्जातील त्रुटी

दयेची याचिका फेटाळून सात वर्षांनंतरही फाशीच्या शिक्षेच्या अंमलबजावणीस अवास्तव आणि अनावश्यक उशीर झाल्याने आरोपींच्या घटनात्मक अधिकारांचे उल्लंघन झाले आहे; आणि हा असा उशीर झाल्यामुळे त्यांच्यावर अमानुष परिणाम होतो, असे कारण नमूद करीत पुण्यातील एका प्रकरणाचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला. न्या. अभय ओक, न्या. अमानुल्ला आणि न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. या निकालाद्वारे, पुण्यात हिंजवडी येथे एका कंपनीमध्ये महिला कर्मचाऱ्यावर सामूहिक बलात्कार करून तिचा खून करणारा कॅब चालक आणि त्याच्या साथीदाराच्या फाशीच्या शिक्षेचे ३५ वर्षांच्या जन्मठेपेत रूपांतर करण्याचा मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला. सुमारे दोन वर्षांपूर्वी अशाच उशिरास्तव माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांच्या मारेकऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाने ङ्गमाफीफ दिली होती व त्यावर प्रतिक्रियांचा आगडोंब उसळला होता. आपल्याला आठवत असेल तर, राजधानी नवी दिल्लीतील ङ्गनिर्भयाफ बलात्कार प्रकरणातील नराधमांना त्या नृशंस घटनेनंतर सात वर्षांनीदेखील फाशी होऊ शकली नव्हती. याचे कारण, ते एका मागोमाग एक सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका अर्ज आणि राष्ट्रपतींकडे या संदर्भातील याचिका करू शकले. या पार्श्वभूमीवर, हैदराबाद बलात्कार प्रकरणातील आरोपींचा किंवा बदलापूर येथील लैंगिक छळ प्रकरणातील आरोपीचा एन्काउंटर झाल्यावर सामान्य जनतेने केलेले स्वागत हे आपल्या व्यवस्थेमधील दोषांचा परिपाक आहे, असे म्हटल्यास वावगे ठरेल का? याच अनुषंगाने दया याचिका आणि संबंधित कायदा याबाबत थोडक्यात माहिती घेण्याचा प्रयत्न करू... गुन्हेगारांकडून सादर होणाऱ्या ङ्गदया याचिकाफ हा गेल्या काही वर्षांपासून न्यायालयीन विलंबाचा आणि वादाचा विषय बनला आहे, असे दिसते. राज्यघटनेच्या कलम ७२अन्वये राष्ट्रपतींना, तर कलम १६१अन्वये राज्यपालांना शिक्षा माफीचे, शिक्षा कमी करण्याचे किंवा शिक्षा सौम्य करण्याचे अधिकार आहेत. ङ्गहे अधिकार भारतीय जनतेने राज्यघटनेच्या माध्यमातून राष्ट्रपती आणि राजपाल यांना दिलेले आहेत आणि त्यावर भारतीय कायदेमंडळाने शिक्कामोर्तब केलेले आहे. तसेच काही वेळा न्यायालयासमोर खऱ्या गोष्टी येऊ न शकल्याने किंवा काही गोष्टी नंतर उजेडात आल्यास दयेच्या अधिकाराची गरज आहे; कारण फाशी एकदा दिल्यावर ती कालत्रयी रद्द करता येत नाही,फ अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयानेच केहर सिंग विरुद्ध पंजाब राज्य या खटल्यातील निकालामध्ये या अधिकारांचे समर्थन केले आहे. दयेचा अर्ज कोणी आणि किती वेळा करावा आणि कुठल्या क्रमवारीत दयेचा अर्ज निकाली काढावा, याबद्दल स्पष्ट तरतूद नाही. याचा फायदा गुन्हेगार किंवा त्यांच्या वतीने घेतला जाऊ शकतो, हे निर्भया प्रकरणात बघायला मिळाले. न्यायालयात जाण्याचा, दाद मागण्याचा हक्क आपल्याकडे प्रत्येकाला आहे आणि त्यामुळे फाशीबाबत सर्वोच्च न्यायालयात एकामागून एक पुनर्विचार अर्ज, क्युरेटिव्ह पिटिशन्स दाखल करायच्या आणि प्रकरण भिजत ठेवायचे, असाही प्रकार होताना दिसतो. सन १९८४मधील सर्वोच्च न्यायालयाचा विस्मरणात गेलेला एक निकाल पाहू या. के. पी. मोहमद विरुद्ध सरकार या सन १९८४मधील याचिकेवर निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांमध्ये नमूद केले की ङ्गदयेच्या अर्जांवर तीन महिन्यांत निकाल द्यावा.फ मात्र, आजही याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. उलट दयेच्या अर्जावर निर्णय घ्यायचा झाल्यास, ते गुन्हेगारांच्या घटनात्मक अधिकारांचे उल्लंघन होते, असे सर्वोच्च न्यायालयाचे निकाल आहेत. याच धर्तीवर सन १९८९मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठाने ङ्गत्रिवेणीबेन विरुद्ध गुजरात सरकारफ या याचिकेवर निर्णय देताना नमूद केले, की ङ्गफेरविचार याचिका आणि वेगवेगळ्या लोकांमार्फत केलेले दयेचे अर्ज यामध्ये गेलेला वेळ याचा फायदा आरोपीना होऊ शकणार नाही.फ खरे म्हणजे, दयेच्या अर्जावर होणाऱ्या उशिराबद्दल राष्ट्रपतींवर उगाचच खापर फोडले जाते. आपल्या राज्यघटनेप्रमाणे राष्ट्रपती हे केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच काम करतात. त्यामुळे बरेच वेळा इथे राजकारण खेळले जाते की काय असा संशय येण्यास जागा राहते. सर्वोच्च न्यायालयाने एपरू सुधाकरन (२००६) यांच्या याचिकेवर निर्णय देताना स्पष्ट नमूद केले आहे की ङ्गजातपात, धर्म किंवा राजकीय निष्ठा या गोष्टी दयेच्या अर्ज निकाली काढण्याच्या संदर्भात पूर्णपणे गैरलागू आहेत आणि हे अर्ज निकाली काढताना गुन्हेगारांबरोबरच पीडित व्यक्ती आणि समाज यांचाही विचार करणे महत्त्वाचे आणि क्रमप्राप्त आहे.फ कारण या प्रकरणामध्ये आरोपी हा काँग्रेस पक्षाचा चांगला कार्यकर्ता आहे, म्हणून राज्यपालांनी त्याच्या दयेचा अर्ज मंजूर केलेला असतो! भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ४७३-४७८ (पूर्वीच्या फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३२, ४३३, ४३३-अ) प्रमाणे राज्य आणि केंद्र सरकारलाही गुन्हेगाराची शिक्षा माफ करण्याचा किंवा शिक्षा कमी करण्याचा अधिकार आहे. मात्र, राज्य सरकारला हा अधिकार वापरायचा असेल तर त्यासाठी त्याला केंद्र सरकारच्या परवानगीची गरज असते. माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांच्या मारेकऱ्यांबाबत या तरतुदींचा वापर अधिक प्रमाणात केलेला आढळतो. यालाही काही अपवाद आहेत. उदा. जन्मठेपेची शिक्षा दिली असेल आणि त्याच गुन्ह्यात फाशीची शिक्षा देता येत असेल, किंवा फाशीची शिक्षा कमी करून जन्मठेपेची शिक्षा दिली जाते, अशा वेळी जोपर्यंत गुन्हेगार १४ वर्षे जन्मठेप भोगत नाही तोपर्यंत त्याची शिक्षा कमी करता येत नाही. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी राजीव हत्या प्रकरणातील गुन्हेगारांना माफ केले, हा त्यांच्या मनाचा मोठेपणा म्हणता येईल; पण हे न्यायालयासाठी बंधनकारक नाही आणि तसा अधिकार कोणालाही नसतो. राजीव गांधी यांच्या मारेकऱ्यांना सोडताना ङ्गआरोपींची तुरुंगातील वर्तणूक चांगली होती, त्यांनी पुस्तके लिहिली, पदव्या संपादल्या,फ असे निरीक्षण न्या. भूषण गवई आणि बी. व्ही. नागरत्न यांच्या खंडपीठाने नमूद केले होते. याचा धोकादायक पायंडा पडू शकतो. हजारो कैदी तुरुंगात खितपत पडून आहेत आणि त्यांनीही पदव्या घेतल्या असतील, त्यांचीही वर्तणूक चांगली असेल; मग त्यांनाही आता सोडून देणार का? या सर्व प्रकारात पीडित आणि त्यांच्या कुटुंबांचा विचार होणे देखील गरजेचे आहे. वरील सर्व बाबी लक्षात घेता आणि न्यायालयाचे उलट-सुलट निकाल येणे रोखण्यासाठी आता दयेच्या अर्जसंबंधी त्रुटी दूर व्हायला हव्यात. त्यासाठी आता केंद्र सरकारने पाऊल उचलले पाहिजे. अर्ज कोण आणि किती वेळा करू शकतो, आलेला अर्ज किती वेळात निकाली काढायचा, या संदर्भात अतिशय स्पष्ट तरतुदी करणे गरजेचे आहे. तसेच खोटे अर्ज करणाऱ्यांना जबर शिक्षेची तरतूद करावी. तरच या संबंधीच्या पेचातून मार्ग निघेल

# कुबेर नगरीतील ऐश्वर्य..!

तस मुंबईशी नात जुनच आहे. म्हणजे अगदी कॉलेज जीवनापासून. विद्यार्थी दशेत मोर्चा, आंदोलने आणि नोकरीच्या काळात संघटना बैठका इत्यादीसाठी असंख्य वेळा या महाकाय शहरात जाणे व्हायचे. सुरवातीच्या काळात अवाढव्य पसारा पाहून दिपून जायचो. नंतर सवय झाली पण आकर्षण काही कमी झाले नाही. असच कर्मचाऱ्यांच्या एका कोर्ट केसच्या निमित्ताने आज पुन्हा मुंबईतील फोर्ट भागात आमचे परम मित्र व ज्येष्ठ विधीज्ञ एड विष्णु ढोबळे यांच्या सोबत दोन दिवस राहण्याचा योग आला. यापूर्वी बहुतेक सर्व प्रसंगी काम आटोपले की मिळेल त्या गाडीने आणि जड मनाने मुंबई सोडायची असाच शिरस्ता असायचा. पण यावेळी कामाच्या नंतर एक दिवस राहणे झाले आणि फोर्ट भागातल्या ऐटबाज, भव्य आणि देखण्या दगडी इमारती अगदी झगमगाटात पाहायला मिळाल्या. या भागातील आझाद मैदान, मंत्रालय, काळा घोडा ही स्थळ म्हणजे ढोबळे यांच्या आंदोलनाची मैदानेच असायची.. संपूर्ण महाराष्ट्रात गाजलेले बी एड आंदोलन, दलीत शिष्यवृत्ती वाढ आंदोलन इत्यादी दीर्घ काळ चाललेल्या संसदीय लढायांनी गाजवलेला हा परिसर आम्हाला सुपरिचित असाच होता. चर्चगेट समोरील काळ्याशार डांबरी रस्त्यावरुन गगनभेदी घोषणा देत निघालेला विद्यार्थ्यांचा लांबच लांब मोर्चा आणि रस्त्याच्या चारही बाजूला स्तब्ध झालेली आलिशान वाहतूक हे दृश्य नेहमीच बघायला मिळायचे. अशा अनेक जुन्या आठवणी आणि प्रश्नांची त्यांच्या सोबत चर्चा आणि गप्पा यांची मैफल चांगलीच जमली. प्रसन्नता आणि ऊर्जा देणारी विलक्षण अनुभूती या परिसरातील दिवसभराच्या निवांत भटकंती मुळे मिळाली. या वेळचा हा निवांतपणा या संपन्न परिसराचे अनोखे, स्फूर्तिदायी दर्शन घडवून गेला.. सर्वप्रथम डोळे भरून पाहिले ते दृश्य म्हणजे हुतात्मा चौकात उभारलेले स्त्री पुरुष कामगाराचे लढावू शिल्प आणि त्याच्या भोवताली संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात गोळीबाराला बळी पडलेल्या हुतात्म्यांची नावे..!

किती अपार कष्टातून आणि असीम त्यागातून मुंबई महाराष्ट्राला मिळाली याच्या स्मरणाने क्षणभर मन सुन्न झाले आणि नंतर नतमस्तक...! हे स्मारक ओलांडून पुढे गेलो तर रस्त्याच्या उजव्या बाजूला पुस्तकांचे भव्य दालन किताबखाना या नावाने वसलेले आहे. तिथे सर्व विषयावरील नव्या जुन्या पुस्तकांचा खजिनाच पाहायला मिळाला. मग काय अनिल बर्वे, राम पूनियानी, पी बी सावंत, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची पुस्तक अधाशासारखी खरेदी केली आणि पुन्हा रस्त्याच्या कडेने फिरताना पुस्तकांचे शिगोशिग भरलेले फूटपाथ पाहून किती घ्यावे आणि किती नको असे होवून गेले. तिथेही प्रेमचंद,पंडित नेहरू, बर्ट्रांड रसेल यांची




पुस्तक घेण्याचा मोह आवरता आवरला नाही. दर्दी वाचकांसाठी फुटपाथवरील पुस्तकांची ही दुकाने म्हणजे एक खास अशी मेजवानीच आहे..! अशीच आसपास भटकंती करत असताना सिध्दार्थ कॉलेजपाशी येवुन थांबलो. दस्तुरखुद्द बाबासाहेबांनी सुरू केलेल्या संस्थेचे कॉलेज. सुमारे अर्धा फर्लांग लांबीची जुनी भव्य दगडी इमारत. भारतातील सर्वात श्रीमंत असलेल्या फोर्ट परिसरात.. ज्यांना इथल्या मनुवादी व्यवस्थेने शिक्षण नाकारले त्या समाजात जन्मलेल्या व्यक्तीने स्वतः चे असामान्य बुध्दीसामर्थ्य आणि अफाट कर्तबगारी यांच्या बळावर फोर्ट मधे उभारलेले हे भव्य विद्यामंदिर पाहून अभिमानाने आणि आनंदाने उर भरून आला. कॉलेज च्या प्रवेशद्वारावर काही फोटो घेवून कॉलेज पाहण्यासाठी म्हणून आत शिरलो ते थेट कॉलेजच्या लायब्ररी मधे गेलो. तिथे असलेल्या एका सभ्य गृहस्थाने आमचे स्मित हास्याने स्वागत करून त्यांच्यासमोर बसण्यास खुर्ची दिली. ते या लायब्ररीत अनेक वर्षांपासून ग्रंथपाल म्हणून काम करत आहेत. ढोबळे यांनी औरंगाबादचा संदर्भ देवून आपली ओळख करून दिली तेव्हा त्यांना मनोमन आनंद झाला. तेही औरंगाबादला शिकले असल्याचे त्यांनी सांगितले आणि हे ही आवर्जून सांगितले की विद्यार्थी दशेत ढोबळे यांच्या नेतृत्वाखाली मिलिंद परिसरात झालेल्या अनेक मोर्चात व आंदोलनात त्यांनी हिरीरीने सहभाग घेतला होता. मग त्यांनी चहा मागवला, चर्चा रंगली. सद्य परिस्थिती, समाजकारण, राजकारण, धम्म चळवळ असे अनेक विषय निघाले. ढोबळे यांनी नेहमीच्या आवेशात भीषण वास्तवाचा वेध घेत एकूणच सुधारणावादी, परिवर्तनवादी चळवळींना पुढे येणे कठीण झाले असल्याचे नमूद केले. देश विदेशातील संघर्ष, बदलते तंत्रज्ञान आणि हितसंबंध यांच्या पार्श्वभूमीवर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य पुन्हा एकदा समजावून घेवून त्यांना अभिप्रेत असलेली सर्वंकष परिवर्तनाची चळवळ पुढे नेण्याची गरज अधोरेखित केली. तेव्हा त्यांनीही गटातटात विभागलेल्या स्वार्थी नेत्यांनी आपापले सवते सुभे निर्माण करून समाजाचे ऐक्य भंग केले आणि त्यामुळे व्यापक चळवळ उभी करता आली नाही याबद्दल अंतर्मुख होवून मनस्वी खंत व्यक्त केली. मिलिंद महाविद्यालयातून घडलेली पिढी वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असताना, जीवनभर प्रगल्भ आणि प्रागतिक सामाजिक विचारांची बांधिलकी जपणारी असते याचा पुन्हा प्रत्यय त्यांच्याशी बोलताना आला. अत्यंत मनमिळावू आणि अगत्यशील व्यक्तिमत्त्वाचा परिचय आणि स्नेह सोबत घेवून आम्ही परत निघालो तेव्हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ज्या खुर्चीवर बसून लेखन वाचन करत होते ती खुर्ची तिथल्या दालनात ठेवली असल्याचे दिसले. त्या खुर्चीला थरथरत्या हातांनी स्पर्श करून, बाबासाहेब त्या खुर्चीत बसले आहेत असे चित्र कल्पनाचक्षुंनी आपोआपच दृश्यमान केले होते ते अनुभवले आणि हा अनमोल ठेवा जतन केल्याबद्दल ग्रंथपाल व संस्था यांना मनःपुर्वक धन्यवाद देवून आम्ही बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या वास्तूचा निरोप घेतला. फोर्ट परिसरातील अफाट श्रीमंतीला खऱ्या अर्थाने वैभव प्राप्त करून देणारे हे कॉलेज म्हणजे रक्ताचा एकही थेंब न सांडता आर्थिक आणि सामाजिक समानता निर्माण करण्याचे जे स्वप्न भारतमातेच्या महान सुपुत्राने संविधानाच्या रुपात पाहिले त्यांची प्रेरणादायी आठवण देत राहणारा राष्ट्रीय स्तंभ आहे याची प्रकर्षाने जाणीव झाली. या जगावेगळ्या ऐश्वर्याचा आणि त्यांच्या पावन स्मृतींचा दरवळ मनात साठवून संध्याकाळच्या गाडीने ढोबळे औरंगाबादकडे आणि मी पुण्याकडे मार्गस्थ झालो....!

**-रंजन दाणी,संभाजीनगर**

# सध्याच्या धावपळीच्या युगातआपल्या आयुष्याला जपा..!

आजच्या युगात प्रगतीचे यशोशिखर गाठण्यात मानवाला यश आले आहे; पण आपल्या आयुष्याला पुरेशी विश्रांती देण्यात तो अपयशी ठरला असून यामुळेच आज हृदयविकार, क्षयरोग, बी.पी. शुगरचे विकार तसेच विविध शारीरिक आजार, व्यसनाधीनतामुळे तो अल्पायुषी ठरला आहे. वर्तमानपत्रात तरूण वयातच हार्टअटॅकमुळे मुत्यु झालेल्या व्यक्तींची बातमी वाचून खूप वाईट वाटत आहे. मृत्यू कोणाच्याही हातात नाही; मात्र आपल्या शरीराला जपणे आपल्या हातात आहे. अधिक वर्षे जगायचे असल्यास निर्व्यसनी राहावे व आपले आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी स्वतःच्या आयुष्याला वेळ द्यायला हवा. जसे आपण मोबाइल चार्ज करतो, गाडीत पेट्रोल टाकतो तेव्हा या वस्तू चालू होतात तसे आपल्या शरीराला व मनालाही व्यायामरूपी चार्जिंगची गरज आहे. आजच्या युगात माणूस अल्पायुषी का ठरत आहे कारण काय तर, उशिरा उठणे, व्यायामाचा अभाव, व्यसनाधीनता, मोबाईलसाठी सहा ते आठ तास घालवणे यामुळे तहान भूक विसरणे, बाहेरचे मसालेदार पदार्थ खाणे ही कारणे आहेत. आता दिर्घायुष्य मिळवण्यासाठी काय करावे हे सांगतो, सकाळी पाचला उठून प्राप्तविधी नंतर व्यायाम, योगासने, किमान अर्धातास चालणे नंतर आंघोळ व सकाळी घरचे ताजे जेवण करणे, रात्री लवकर ८ च्या आत जेवणे व नंतर किमान अर्धातास फिरणे रात्री १० च्या आत झोपणे व सकाळी लवकर उठणे, बाहेरचे मसालेदार पदार्थ खाणे टाळावे, निर्व्यसनी जिवन जगावे मोबाईलचा गरजेपुरता वापर करणे हे उपाय निश्चितच चांगले आहेत. आपण झोप वगळता दिवसभर एवढे व्यस्त असतो की आपल्याकडे लक्ष द्यायला आपल्याला वेळच नसतो दोन चार तास मिळतात तेही आपण मोबाईल मधून सोशल मीडियात रमून व्यर्थ वेळ घालवत चाललो आहोत. हे बदलायला हवे. अहो साधे कटींगचे दुकान, किराणा दुकान जवळच चौकात असताना आपण तिथेही मोटार सायकल वर बसून जातो, छोट्या कामात व जवळच्या ठिकाणावर जाण्यासाठी आपण गाडी वापरतो हे खुप चुकीचे आहे कारण यामुळे आपले थोडेफार चालणेही बंद होत आहे. आणि यामुळेच आपले आरोग्य बिघडत चालले आहे. शरीराराची हालचालच होत नसेल तर भुकच लागणार नाही यामुळे भुक मंदावते. सध्या फास्ट फूडची फॅशन सुरू झाली आहे मात्र या खाण्याने पोटाचे विकार, पित्तदोष, पेंडिक्सच्या रुग्णात वाढ होत आहे. त्यामुळे घरचे ताजे जेवण सर्वोत्तम आहे. आज निष्काळजीपणाने वाहन चालवून अनेकांचा घात झाला आहे हे टाळण्यासाठी वेगाला मर्यादा यायला हव्यात. दिवसभरातून स्वतःसाठी एक तास , कुटुंबासाठी दोन तास वेळ द्यायला हवा. महिन्यातून एकदा सर्व कुटुंबाने निसर्गरम्य ठिकाणी जाऊन वन भोजन, गप्पा, गोष्टी,गाणी म्हणल्यास नक्कीच तणाव मुक्ती होऊन सर्व आनंदीत होतील. आपले वर्तमान व भविष्य घडविण्यासाठी रणनीती आखण्याची गरज आहे त्यासाठी देखील वेळ काढावा लागेल नाहीतर तुम्ही सोशल मीडियावर दुसऱ्याच्या पोस्टवर लाईक कमेंट करीत बसताल यातच सर्व वेळ गेल्याने आता पुढे काय करायचे हे तुम्हाला कळणारच नाही म्हणूनच वेळीच जागे व्हा मोबाईलचा वापर कामापुरताच करा त्याएवजी पुस्तक वाचन, धार्मिक ग्रंथ वाचन, संगीत शिक्षणाकडे लक्ष दिल्यास एकाग्रता येऊन आपला तणाव नक्कीच नाहीसा होईल. शेवटी या सुंदर जीवनाला आनंदीत ठेवण्यासाठी, निरोगी राहण्यासाठी आपण स्वतःला वेळ द्यायला हवा यासाठीच हा शब्द प्रपंच लिहीला आहे.

:: लेखक ::
**पवन सपकाळ**
(उपसंपादक सायं.दै.बीड किसान)
मो.९६८९८२६८७०

# ज्ञानदीप विद्यालयातील पालक मेळाव्यास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

कल्लेधारूर (वार्ताहार) धारूर येथील ज्ञानदीप विद्यालय व बालसस्कार केद्रातील पालकाचा पालक मेळावा व विवीध स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्याचा गुणगौरव विवीध स्पर्धा चे बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. या शाळेतील विवीध उपक्रम विशेषताह बाल वया पासुन स्पर्धा परीक्षाचे दिले जाणारे मार्गदर्शन यांचे पालकानी विशेष कौतूक केले व काही सुचना पालकानी माडल्या. या पालक मेळाव्यास उस्फुर्त प्रतीसाद मिळाला. किल्ले धारूर तालुक्यातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बालसंस्कार केंद्र किल्ले धारुर या ठिकाणी पालक मेळाव्याचे आयोजन आज करण्यात आले होते. या पालक मेळाव्यास मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होते कार्यक्रमाची सुरुवात क्रातीज्योती सावित्रीबाई फुले व सरस्वती माता यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून करण्यात आली. त्यानंतर विद्यालयातील विविध शालेय स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा व विद्यालयात विद्यार्थी व पालकांसाठी राबवण्यात आलेल्या विविध उपक्रम व स्पर्धेतील बक्षिस वितरण करून गौरव करण्यात आला त्यानंतर विद्यालयातील पालकांनी आपले विद्यालयाविषयी मनोगत व्यक्त केले तर उपस्थित मान्यवरांनी पालक व शिक्षक यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयातील पालक अशोक राठोड तर प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रकांत देशपांडे , सय्यद शाकेर, दिनेश कापसे, नवनाथ नखाते, तानाजी शिंपले, शैला महाजन, उज्वला शिनगारे, ढाने मॅडम हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिक्षक अशोक अंडील , प्रस्ताविक शिक्षक सचिन चव्हाण तर आभार शिक्षीका वर्षा [illegible] यांनी मानले कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले मातापालक व पालक मोठया संख्येने या पालक मेळाव्यास उपस्थीत होत



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २४ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com


# नाराज छगन भुजबळ थेट देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला



मुंबई । वृत्तसेवा मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे नाराज झाले आहेत. ओबीसीचा मोठा चेहरा असूनही राज्य मंत्रिमंडळात भुजबळांना डावलण्यात आलं. त्यामुळे भुजबळांनी जाहीर पणे नाराजी व्यक्त केली. तरीही पक्ष नेतृत्वाकडून कोणतीही दखल न घेतली घेल्याने छगन भुजबळ थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला गेले आहे. ते सागर बंगल्यावर दाखल झाले असून राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. भुजबळ काय निर्णय घेता याकडे राज्याचे लक्ष लागून आहे. ऐनथंडीच्या मोसमात छगन भुजबळांमुळे नाशिकचं राजकारण चांगलच तापलं आहे. भुजबळांनी नाराजीनंतर जहाँ नहीं चैना वहा नहीं रहना, असं सूचक वक्तव्य केलं होतं. यामुळे छगन भुजबळ वेगळी वाट धरणार असल्याची चर्चा आहे. भुजबळांकडे तीन पर्याय असल्याचे बोलले जात आहे. त्यात पहिला पर्याय शरद पवार गटात पुन्हा जाणे, दुसरा भाजपमध्ये प्रवेश करणे तर तिसरा पर्याय स्वत:चे ओबीसी संघटन करणे होय. मात्र, नाशिकमधील मेळाव्यात भुजबळांनी आपण घाई न करता निर्णय घेणार असल्याचे स्पष्ट केले होते. राष्ट्रवादी सोडण्याच्या चर्चेला त्यांनी एकप्रकारे पूर्णविराम दिला होता. मात्र, आज अशातच भुजबळ अजित पवार, सुनिल तटकरे यांना न भेटता थेट फडणवीसांच्या भेटीला गेल्याने खळबळ उडाली आहे.

# बंद करा बंद करा बाल विवाह बंद करा घोषणांनी दौलावडगाव दणाणले



दौलावडगाव । प्रतिनिधी युनिसेफ, एस.बी.सी.३,जिल्हा प्रशासन, महिला व बाल कल्याण विभाग बीड,पंचायत समिती आष्टी यांच्या सहकार्याने ग्रामीण विकास केंद्र गोमळवाडा या संस्थेच्या वतीने दौलावडगाव व म्हसोबाचीवाडी ता.आष्टी या गावामध्ये युवा सक्षम दिवस,बाल विवाह विरोधी रॅली व पथनाट्याचे दिनांक २१ डिसेंबर रोजी आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांची बाल विवाह निर्मुलनपर जनजागृती रॅली सरस्वती उच्च माध्यमिक विद्यालय ते गावामधुन ग्राम पंचायत कार्यालया पर्यंत काढण्यात आली रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी विविध संदेश देत घोषणा दिल्या.बंद करा बंद करा बाल विवाह बंद करा,सांगू ठणकावून पुन्हा पुन्हा बाल विवाह आहे कायद्याने गुन्हा,एक दोन तीन चार, बाल विवाह प्रथा करु हद्दपार! या घोषणांनी सारे गाव दुमदुमले होते. रॅली नंतर बाल विवाहाचे दुष्परिणाम या विषयावर अनिल खेडकर, विजय मिसाळ, वैभव सस्ते, अरुण धनुरे, रोहित नागरगोजे, सानिका राजपुरे, श्रेया नेमाने, प्राची सरवदे, आकांक्षा सोनवणे,आरती देवकर व सिद्धी चौरे या विद्यार्थ्यांनी जनजागृती पर पथनाट्य सादर करून प्रेक्षकांसमोर ज्वलंत विषय मांडला .यावेळी सरस्वती माध्यमिक विद्यालय दौलावडगाव येथील शेकडो विद्यार्थ्यांनी रॅलीमध्ये सहभाग नोंदवला रॅली व जनजागृती पथनाट्यासाठी ग्रामीण विकास केंद्रचे अध्यक्ष समिर पठाण, दौलावडगावचे सरपंच भरत जाधव, सरस्वती विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल तांदळे सर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चे केंद्रीय मुख्याध्यापक सुरेश कुटे यांची व म्हसोबाचीवाडी येथे तेथील सरपंच अशोक शेकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी, दौलावडगाव ग्रामपंचायत अधिकारी भागवत अनारसे, म्हसोबाचीवाडी ग्रामपंचायत अधिकारी पि . ए.वायकर, दौलावडगाव ग्रामपंचायत कार्यालय चे ताजमहंमद खान, नगिनाबी शेख, सरस्वती उच्च माध्यमिक विद्यालयाचे सर्व शिक्षक, कर्मचारी वृंद यांनी रॅली व पथनाट्य यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.कार्यक्रमात परिसरातील शेकडो महिला व प्रतिष्ठित नागरिक आणि ग्रामस्थांनी सहभाग नोंदवला. दौलावडगावचे ग्रामपंचायत अधिकारी भागवत अनारसे व सरपंच भरत जाधव यांनी या बाल विवाह निर्मुलन जनजागृती कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करून कार्य तत्परता दाखवून दिली व यापुढे ग्रामपंचायत हद्दीत बाल विवाह होणारच नाहित या साठी ग्राम बाल संरक्षण समिती नव्याने स्थापन करून दक्षता घेण्याचा निर्णय घेतला आहे.

# कापूस पिकातील सुधारित नव तंत्रज्ञान लागू करा :- गणेश नाईकवाडे

महाराष्ट्रातील शेतक-यांचे मुख्य पीक म्हणून कापसाच्या पिकाकडे पाहिले जाते पण दरवर्षी कापूस पिकाच्या उत्पादनात होणारी घट व अनेक रोगांना बळी पडणा-या कापसाला संरक्षित करण्यासाठी कराव्या लागणा-या महागड्या फवारन्या वर होणारा नाहक खर्च या सर्व दुष्टचक्रातून मेटाकोटीला आलेला शेतक-यांना वाचवायचं असेल तर जगाच्या स्पर्धेत त्यांच्या बरोबरीने चाललं पाहिजे म्हणजेच आज जगात कापसाच्या बाबतीत वापरण्यात येणारं तंत्रज्ञान म्हणजे बीजी सहा आणि सात हे आहे तर आपल्याकडे आजही वीस वर्षांपूर्वीचे २००३ चे तंत्रज्ञान वापरले जाते. हवामान बदल जमिनीचा बदललेला सामू व इतर अनेक कारणाने जुन्या वाणाच्या उत्पादनात वर्षानुवर्ष घट



होत आहे ऑस्ट्रेलिया ब्राझील सारख्या देशात नवतंत्रज्ञान वापरून कापसाचे विक्रमी उत्पादन घेतले जात आहे आपण वापरत असलेले बीजी टू हे बियाणे सरासरी हेक्टरी ३५० ते ४२० ज्ञस चे उत्पादन देते बीजी सहा आणि सात हे तंत्रज्ञान वापरून इतर देश हेक्टरी २० ते २२०० किलो पर्यंत उत्पादन घेत आहेत. सर्वच कापूस उत्पादक देशांची उत्पादन सरासरी काढल्यास ती हेक्टरी ८०० किलो पर्यंत असल्याचे कळते तर भारताची हेक्टरी उत्पादन क्षमता ही साडेतीनशे ते चारशे वीस किलोचा आहे.

महाराष्ट्रासारख्या सुजलाम सोफलम राज्यात जर रोज सरासरी दोन शेतकरी आत्महत्या करत असतील तर त्यामागे खर्च अधिक व उत्पन्न कमी शिवाय स्व कष्टाची तर मोलच नाही अशी अनेक कारणे जबाबदार असू शकतात गेल्या अनेक कारणाने मारला गेलेला शेतकरी ख-या अर्थाने तारायचा असेल, शेतक-यांची कुचंबना थांबवायची असेल तर नवतंत्रज्ञानाची अंमलबजावणी करणे शिवाय पर्याय नाही यासाठी अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष गणेश नाईकवाडे यांनी संबंधित अधिका-यांना निवेदन देऊन नव तंत्रज्ञानाच्या अंमलबजांची मागणी केली आहे यावेळी त्यांच्यासह युवराज मस्के जिल्हाध्यक्ष छावा, सुरज कोकाटे, संजय गोडसे, अजय मस्के, बीड तालुका अध्यक्ष अविनाश घुगे सह इतर पदाधिका-यांनी लवकरच केंद्रीय कृषिमंत्री यांची भेट घेऊन या विषयी निर्णय घेण्याची विनंती करण्यात येणार असल्याचे कळवले आहे

# साखरपुड्यात विवाह समारंभ करुन खांडे-वेताळ यांनी दाखवला आदर्श



बीड (प्रतिनिधी): पिंपळगाव (म.) येथील दिनकरराव खांडे यांची मुलगी चि.सौ.का. योगिता आणि शिरसदेवी येथील उध्दवराव वेताळ यांचे चिरंजीव विकास यांचा साखरपुडा काल रविवारी पिंपळगाव (म.) येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी गावचे सरपंच काशिनाथराव खांडे यांनी मध्यस्थी करुन दोन्ही कडच्या मंडळींना विवाह समारंभ संपन्न करावा असा आग्रह धरला. त्यानुसार अनावश्यक खर्च टाळून एक नवा आदर्श या दोन्ही परिवाराने निर्माण केला. सध्या लग्नतिथीचे दिवस असून मोठ्या प्रमाणात सर्व धर्मामध्ये विवाह सोहळे संपन्न होत आहेत. जवळपास सर्वच विवाह हे थाटमाटात आणि खुप मोठा खर्च करुन केले जात आहेत. वास्तविक हे समारंभ साध्या पध्दतीने व्हावेत अशी अपेक्षा आहे. परंतु ज्यांच्याकडे पैसा जास्त झाला आहे अशा लोकांना आपल्या घरचे लग्न हे प्रतिष्ठेचे प्रमाण वाटत आहे. जेव्हढा जास्त खर्च करु, जेव्हढे जास्त फटाके वाजवू, जेव्हढा जास्त मोठा डी.जे. लावू आणि जेव्हढा जास्त थाटमाट करु तेव्हढे आम्ही मोठे, प्रतिष्ठीत असा गैरसमज अनेकांचा आहे. अशा परिस्थितीत सुध्दा काही लोक तारतम्य बुध्दीचा वापर करुन खिशात पैसे असले तरी साधेपणाने विवाह आयोजित करत आहेत. पिंपळगाव मजरा या ठिकाणी काल साखरपुड्यातच विवाह संपन्न झाला. त्यासाठी गावचे विद्यमान सरपंच काशिनाथराव खांडे (निवृत्त पोलीस अधिकारी) यांनी हे सामाजिक भान जपण्याचे काम केले. चि.सौ. कां.योगिता आणि चि.विकास यांचा हा विवाह सोहळा इतर मोठ मोठ्या सोहळ्यापेक्षा अनेक पटीने आदर्श आणि अनुकरणीय ठरला आहे.

# तर एचसीपीएल कंपनीला लिंबागणेश येथे गतिरोधक बसविण्यात अडचण काय?



लिंबागणेश (प्रतिनिधी): बीड तालुक्यातील अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील येळंबघाट येथे ग्रामस्थांच्या मागणीवरून गतिरोधक बसविण्यात आलेले आहेत. मात्र याच मार्गावर लिंबागणेश येथील बसस्थानक आणि भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासमोर सुरक्षिततेसाठी गतिरोधक बसविण्यास एचसीपीएल कंपनीला काय अडचण आहे असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर व हरिओम क्षीरसागर यांनी विचारला आहे. अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावरील लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात १००० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असुन शाळेचे मुख्य प्रवेशद्वार अगदी महामार्गाला लागुनच असल्याने शाळा भरताना आणि शाळा सुटल्यानंतर गर्दी असते.याठिकाणी यापूर्वी सुद्धा वारंवार अपघाताच्या घटना घडलेल्या असुन या अपघात प्रवण क्षेत्रात गतिरोधक बसविण्याची मागणी गेल्या २ वर्षांपासून पालकांची असुन डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली २-३ वेळा रास्तारोको आंदोलन करण्यात आलेले आहेत. गेल्यावर्षी दि.४ जानेवारी २०२४ रोजी लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासमोर गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली तब्बल ३ तास रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते. तत्कालीन तहसीलदार सुहास हजारे यांनी याची दखल घेत दि.२० फेब्रुवारी २०२४ रोजी तहसिल कार्यालयात बैठक बोलावली होती.तेव्हा म.रा.म.वि.(मर्या) छत्रपती संभाजीनगर अभियंता महेश देशमुख,नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर, एचसीपीएल कंपनीचे कंत्राटदार यांनी राष्ट्रीय महामार्गावरील गतिरोधक बाबत सडक परीवहन व राजमार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांच्या दि.२९ आगस्ट २०१६ रोजीच्या पत्रकान्वये महामार्गावरील गतिरोधक बाबत सुचना प्राप्त अनुषंगाने गतिरोधक बसविण्यात येणार नाही असे सांगून प्रशासनाची दिशाभूल केली.मात्र बसस्थानक, शाळा, धोकादायक वळण आदी अपघात प्रवण क्षेत्रात ग्रामस्थांनी मागणी केल्यानंतर बसविण्यात येते. त्याच अनुषंगाने एचपीएम कंपनीने येळंबघाट याठिकाणी गतिरोधक बसविले असुन रात्रीच्या वेळी लांबुन गतिरोधक दिसावेत यासाठी रेडीमेड बसविण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे लिंबागणेश याठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी डॉ.गणेश ढवळे व हरिओम क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

# नुतन जिल्हा पोलिस अधीक्षक बीड यांना समस्त दिव्यांग बांधवांनी रुजू होताच केले सन्मानीत

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था बाधीत झाल्याप्रकरणी विद्यमान पोलिस अधीक्षक श्रीयुत अविनाश बार्गळ यांची मुख्यमंत्र्यांच्या निर्देशाने तडकाफडकी बदली झाल्याने बाधीत झालेली कारदा व सुव्यवस्था सुधारण्याकरीता बीड जिल्हा पोलिस अधीक्षक पदी श्रीयुत नवनित कावत हे दि.२१/१२/२०२४ रोजी पोलिस अधीक्षक पदावर रुजू झाले. कावत पोलिस अधीक्षक पदावर रुजू होताच दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आ- ठवले यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील समस्त दिव्यांग बांधव उपस्थित राहुन श्रीयुत नवनित कावत यांना दिव्यांग हक्क अधिकार शासकीय पुस्तीका व माजी सनदी अधिकारी श्रीयुत सदानंद कोचे लिखित बीडची लोकशाही एक भयान वास्तव ही पुस्तीका सन्मानपूर्वक भेट देवून त्यांना यथोचित सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी श्रीयुत नवनित कावत यांनी उपस्थित दिव्यांग बांधवांना संबोधित करताना सांगितले की यापुढे दिव्यांग व्यक्तींवर अन्याय करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची गय केली जाणार नाही. तसेच परळी येथे शिवभोजन चालकाने दिव्यांग व्यक्तीस केलेल्या मारहाण प्रकरणी



चालकास तात्काळ अटक करण्याचे आदेश संबंधित पोलिस निरीक्षकांना दिले. या सन्मान प्रसंगी शासन मान्यता प्राप्त महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांच्यासह श्रीराम घुमरे, शेख युसूफ, अतुल मिटकरी, गणेश आवनकर इ.दिव्यांग बांधव- ांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या स्वरुपाची माहिती अशोक आठव- ले यांनी प्रसिद्धीपत्रकान्वय दिव्यांग व्यक्तींच्या हितार्थ कळवली आह

# साधेपणानं लग्न ही काळाची गरज!

**विद्या सरपाते**

मुलीचा जन्म झाला की, तिच्या पित्याला काळजी असते ती तिच्या लग्नाची!अगदी बाळात्यात असल्यापासून तिला चांगला जोडीदार मिळाला पाहिजे,तिचा संसार सुखाचा झाला पाहिजे . तिच्या शिक्षणाचा , उज्वल भविष्यासाचा विचार त्याच्या डोक्यात अजिबात येत नाही. आणि तेव्हापासूनच तो पोट मारुन पैपै पदराला बांधून ठेवतो.

हळूहळू मुलगी मोठी होऊन लग्नाच्या उंबरठ्यात येऊन ठेपते,मग चालू होते वर संशोधन.! मुलीचा जोडा शोधता शोधता त्याच्या पायीचा जोडा पारं झिजून जातो.मनासारखं स्थळ मिळेपर्यंत सुखाची झोप घेत नाही.मुलगी जर रंगानं काळी, सुस्वरूप नसेल तर तिला अनेक नकार पचवावे लागतात. लग्न जमवणे आणि बाजारात बैल घेणे सारखंच असते.बैल कामाला चांगला नसला तरी चालेल पण दिसायला रुबाबदार आणि देखणा असावा लागतो. एकवेळ मारका असला तरी चालेल पण दिसायला चांगलाच हवा!त्याचे दात,शिंगं,खुर हे सारं काही बघून बैल खरेदी केला जातो.दलालाशिवाय बैल विकल्या आणि घेतल्या जाऊ शकत नाही.आजकाल लग्नासाठी मुलगी मिळणं फार अवघड होऊन बसलंय म्हणून अशा दलालांचा सुळसुळाट झालाय. काहींचा तर हा धंदा होऊन बसलाय.मुलीला कोणी पसंत करत नाही म्हणून मुलीचे वडील वैतागलेले असतात.ते अशा दलालांना बळी पडतात.कधीकधी मुलगा विधुर, घटस्फोटीत असतो.मुलांचा पिताही असतो.दोनदोन बायकाही असतात.गुन्हेगारी प्रवृत्तीचाही असतो. कधीकधी तर लग्नाच्या नावाखाली मुली विकण्याचा त्याचा धंदाही असतो.ब-याचदा वधू पित्याची फसवणूक होते. त्याच्यापासून या गोष्टी लपवल्या जातात. नोकरी, संपत्तीची खोटी माहिती देऊन लग्न जमवले जातात.

कायद्यानं हुंडा बंदी असली तरी ही प्रथा काही बंद झालेली नाही. नोकरी करणा-I नवरदेवाचे भाव तर गगनाला भिडलेले आहेत.मुलगी कितीही सुंदर,सुशिल,शिकलेली, आणि पदाधिकारी असली तरी काही महाभाग लग्नाआधी तुम्ही तिची कमाई खाल्ली असेल म्हणून हुंडा घेतात तर मुलाच्या शिक्षणाला खूप खर्च आला म्हणून मुलांचे आईवडील हुंडा मागतात.

नवरदेव जर शेतकरी असेल तर त्याचे भाव एकरावर आणि जिरायती, बागायती यांवरुन ठरतात.एकटा असेल तर जरा महाग असतो.ब-याचदा मजोड्याला जोडाफ नसला तरी केवळ संपत्ती पाहून लग्न जुळवले जातात.उपवर, घटस्फोटीत,विधुर मुलाला अल्पवयीन मुलगी दिली जाते.नंतर अशी लग्न टिकतातंच असे नाही.

एकदा का लग्न जमलं की दहा पाहुणे मुलाचं घर बघायला जातात.नंतर मुलाकडचे वीस पाहुणे मुलीच घर बघायला येतात.मग एवढ्या लोकांचा जेवणाचा खर्च...त्यानंतर होतो साखरपुडा!

आणि सोबत महिला असतील तर त्यांच्या साड्यांचा खर्च तो वेगळाच!

मुलीचे वडील मुलीच्या लग्नासाठी पैपै जोडून ठेवतात.हुंड्यासाठी कर्ज काढतात आणि उदरनिर्वाहासाठी असलेलं एकर,दोन एकर विकून भूमिहीन होतात.एवढं करून लेकीच लग्नानंतर चांगलंच होईल याची शाश्वती नसते.साखरपुड्याच्या दिवशी शिदोरी देण्याची पद्धत असते.पूर्वी फक्त पाच दुरड्या भरून शिदोरी देत असत.आता शंभर मोठमोठाले डबे भरून शिदोरी दिली जाते जिला कोणी खात नाही.बरं फक्त शिदोरी वरच भागत नाही तर जेवढ्या विहीणी असतील तेवढ्यांना भेटवस्तू ही द्यावीचं लागते.तिखट, चटण्या,तुपाच्या बरण्या, मेकअप च सामान,काजू,बदाम.बापरे!बाप!ही काय प्रथा आहे.अहो! गरिबांना कीती त्रास होतो याचा!लग्न पद्धतीत कमी होण्याऐवजी एक एक रिवाज वाढतंच चाललाय.आजकाल लग्नात पद्धती या कमी होण्यापेक्षा वाढतंच चालल्यात ज्याचा फटका गरिबांना बसतो.एका लग्नाचा खर्च फेडण्यासाठी वधू पित्याला कितीतरी वर्ष कष्ट सोसावे लागतात.कर्ज फेडता फेडता त्याच्या नाकी नऊ येतात.

साखरपुडा किंवा सोयरिक पक्की झाली की,नव-या मुलीला भ्रमणध्वनी नव-या मुलांकडून दिला जातो.ब-याचदा यामुळं लग्न मोडतात.बर मुलीच्या अंगावर लग्नात जे दागिने घातले जातात ते दिलेल्या हुंड्यातून.

नंतर दिवस येतो तो बस्ता बांधण्याचा! यांचे दहा माणसं त्यांचे दहा माणसं बसतात एका मोठ्या दुकानात! मुलीकडे बस्ता असल्यास नव-यामुलाकडचे, लग्न एकदाच होते म्हणून महागडे कपडे घेतो.बरं किंमती नुसार कपड्यांचा दर्जा नसतो.फक्त दुकानदाराचा फायदा. नव-यामुलीच्याही साड्या फार महाग! लग्नानंतर फक्त कपाटातंच पडून असतात.दोन्हीकडचे लोकं फक्त मयाला गाड त्याला गाडफ हेच धोरण राबवत असतात.

## पं.शिरभाते यांच्या पुण्यस्मरण निमित्त संगीत सभेचे आयोजन

नांदेड (प्रतिनिधी) अंध विद्यालय बोधडी येथे संगीत विभागाच्या माध्यमातून हजारो अंध विद्यार्थ्यांच्या जीवनात स्वर प्रकाशाने जीवन उजळुन अंधारातून प्रकाशाकडे नेणारे आदर्श गुरूजी स्व. पंडीत वसंतराव शिरभाते यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण दिनानिमित्त स्मृती संगीत सभा मंगळवार दि.२४ डिसेंबर रोजी बोधडी तालुका किनवट येथे आयोजित करण्यात आली असून त्यामधे नांदेड येथील सुप्रसिध्द सतार वादक कलावंत पं. अतुल देशपांडे ( पं. रामकृष्ण जोशी यांचे शिष्य).यांचे सतार वादन आणि स्व. पंडीत वसंतराव शिरभाते यांचे शिष्य व सुपुत्र पंकज शिरभाते यांचे व्हायोलिन वादन संपन्न होईल त्यांना सुप्रसिद्ध तबला वादक श्री रमाकांत जोशी हे तबल्यावर संगत करतील. हा कार्यक्रम आदिवासी कला शिक्षण संस्था किनवट संचलित अंध विद्यालय बोधडी बुद्रुक ता. किनवट जि. नांदेड येथे सायंकाळी सहा वाजता आरंभ होईल. पहिल्या पुण्यस्मरण निमित्त अनहत व ऐनोद्दीन शेख वारसी यांचे बासरी वादन. दुसऱ्या पुण्यस्मरण निमित्त ह. भ. प. भालचंद्र महाराज सरदेशपांडे यांचं नारदीय कीर्तन, तिसऱ्या पुण्यस्मरण निमित्त युवा कलाकार सौ. मानसी देशपांडे, स्वरूप देशपांडे व प्रशांत गाजरे. यांचे गायन आणि तबला वादन असे बहारदार कार्यक्रम संपन्न झालेले आहे. बोधडी येथील अंध शाळेचे संगीत विभाग प्रमुख म्हणून स्व. पं. वसंतराव शिरभाते यांचे पट्टशिष्य व गुणी संगीत शिक्षक राजेश ठाकरे समर्थपणे गुरुजींचा वारसा चालवीत आहेत. तरी चतुर्थ स्मरण दिनानिमित्त बोधडी व परिसरातील संगीत रसिकांनी या संगीत कार्यक्रमास अवश्य यावे असे आवाहन आयोजक राजु भीमराव टारपे (अध्यक्ष) , प्रकाश भीमराव टारपे (सचिव) व सौ. नंदा नवसागरे (प्राचार्य अंध विद्यालय बोधडी) तसेच शिरभाते परिवार आणि सर्व विद्यार्थीवृंद यांनी केले आहे.

# संतोष देशमुख कुटुंबाच्या मदतीला एकनाथ शिंदे धावले, उपमुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

## एकनाथ शिंदे देशमुख कुटुंबाच्या पाठीशी



**बीड,/प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली होती. या घटनेनं महाराष्ट्रात खळबळ उडाली. वातावरण चांगलंच तापलं. दरम्यान आज शिवसेना नेते आणि मंत्री उदय सामंत यांनी म स्साजोगमध्ये जाऊन संतोष देशमुख कुटुंबाची भेट घेतली, त्यांचं सांत्वन केलं. संतोष देशमुख यांची ज्या लोकांनी मिळून हत्या केली त्यातील ज्यांना अजूनही अटक झालेली नाहीये, त्यांच्या अटकेची कारवाई तातडीनं केली जाईल. कुणालाही पाठिशी घातलं जाणार नाही, हा एकनाथ शिंदे साहेबांचा निरोप घेऊन मी इथे आलो आहे, असं उदय सामंत यांनी म्हटलं.

**नेमकं काय म्हणाले सामंत?**

संतोष देशमुख यांची ज्या लोकांनी मिळून हत्या केली त्यातील ज्यांना अजूनही अटक झालेली नाहीये, त्यांच्या अटकेची कारवाई तातडीनं केली जाईल. कुणालाही पाठिशी घातलं जाणार नाही, हा एकनाथ शिंदे साहेबांचा निरोप घेऊन मी इथे आलो आहे, देशमुख कुटुंबाला म दत घेऊन शिंदे साहेबांनी पाठवलं होतं, ती मदत कुटुंबाला केली आहे. स्वतःचं घर उभं करण्यासाठी जे जे काही लागेल ते शिंदे साहेब सहकार्य करतील, असं यावेळी उदय सामंत यांनी म्हटलं आहे. दरम्यान पुढे बोलताना त्यांनी म्हटलं की, कुठल्याही परिस्थितीमध्ये कोणालाही वाचवलं जाणार नाही. कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. ज्या कोणाचा यामध्ये हात आहे, त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल, आणि देशमुख कुटुंबाला न्याय मिळून देऊ. पोलीस अधीक्षक यांनी नव्याने चार्ज घेतल्यानंतर त्यांची भूमिका त्यांनी जाहीर केली आहे. त्यांच्या पाठीशी शासन म्हणून आम्ही आहोत, तातडीने जे गुन्हेगार आहेत त्यांना अटक केलं जाईल.. शिवसेना म्हणून एकनाथ शिंदे साहेब यांच्या वतीने आम्ही देशमुख कुटुंबाच्या पाठीशी आहोत. आयजीच्या नेतृत्वाखाली एस आय टी नेमलेली आहे. न्यायालयीन चौकशी देखील होणार आहे, त्यामध्ये जे दोषी असतील त्या कोणालाही सोडलं जाणार नाही, असं सामंत यांनी म्हटलं आहे.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणी चिंचाळा येथे कॅण्डल मार्च

आष्टी। प्रतिनिधी मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना अटक झालीच पाहिजे संबंधित प्रकरणातील आरोपी व पाठीराखे,आणि सूत्रधार (आका) यांना देखील अटक झालीच पाहिजे अशा घोषणा देत हातात फलक घेत य चिंचाळा येथे शनिवार सायंकाळी परिसरातील नागरिकांच्या वतीने कँडल मार्च काढत सरपंच हत्येच्या घटनेचा निषेध केला.बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील युवा सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील काही आरोपींना अजूनही अटक झाली नाही उर्वरित सर्व आरोपींना अटक झालीच पाहिजे तसेच यामागील पाठीराखा व मुख्य सूत्रधार यांना सुद्धा अटक झाली पाहिजे त्यांना फाशीचीच शिक्षा व्हावी अशा घोषणा देत गावामध्ये कॅण्डल मा मार्च काढण्यात आला यावेळी लहान मुलांसह गावातील युवक वर्ग,ज्येष्ठ नागरिक,,पदाधिकारी मोठ्या संख्येने या कँडल मार्च मध्ये सहभागी झाले होते.



## एन एस एल शुगर्स ने डिस्लरीचे विषारी पाणी पाटात सोडल्याने शेकाप आक्रमक



माजलगाव । प्रतिनिधी तालुक्यातील धरणाचे पाणी शेतीसाठी सोडण्यात आले असून माजलगाव तालुक्यात उसाच्या पिकाची लागवडीसाठी शेतकरी सज्ज असताना एन एस एल सुगर्स ने ड्रिस्लरी चे विषारी पाणी पाटात सोडल्याने गुरांसह मनुष्याच्या जीवीतास धोका निर्माण झाला असून पिकांचेही नुकसान झाले असून एन एस एल शुगरच्या एन एस एल शुगर्स ने डिस्लरीचे विषारी पाणी पाटात सोडल्याने शेकाप आक्रमक डिसलरी च्या विषारी पाण्याने उसाचे पीक जळण्याच्या भीतीने तीन दिवसापासून शेतकरी ऊस लागवड करायला तयार नाहीत याबाबत शेकापचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन पाहणी करून शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्यानंतर कारखाना प्रशासन, उपविभागीय अभियंता शेतचारी अस्तारीकरण यांना एन एस एल शुगरचे विषारी घाण पाणी थांबवल्या शिवाय शेतकऱ्यांना उसाची लागवड करता येणार नाही ही बाब लक्षात घेऊन उपविभागीय अभियंता शेतचारी अस्तारीकरण उपविभाग क्रमांक दहा यांनी तात्काळ एन एस एल शुगर्स कारखान्यावर गुन्हे दाखल करावेत तसेच एन एस एल सुगर्स कारखान्यास अनेक वेळा विनंती करून देखील माजलगाव धरणाच्या पाठात डिसलरीचे विषारी व घाण पाणी सोडणे चालूच ठेवले असून एन एस एल सुगर्स कारखान्याने माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा विडा उचलला आहे काय.? असा सवाल करत डिसलरी चे विषारी घाण पाणी पाटात सोडणे तात्काळ बंद करावे अन्यथा पशुधना सह मनुष्याच्या जीवित तास धोका निर्माण करणाऱ्या आणि शेतकऱ्यांच्या शेतीच नुकसान करणारा एन एस एल शुगर्स कारखाना बंद करण्याचा इशारा शेकापचे भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी निवेदनाद्वारे २२ डिसेंबर रोजी दिला आहे.

## जिल्हा वकील क्रिकेट संघाच्या उद्घाटन व टी-शर्टचे अनावरण



संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय वकिलांच्या क्रिकेट स्पर्धेसाठी बीड जिल्हा क्रिकेट वकील संघास शुभेच्छा व प्रयोजक कलीम जहांगीर तर्फे क्रिकेट टी-शर्टच अनावरण करताना, बीड जिल्हाचे प्रमूख व सत्र न्यायाधीश मा.आनंद यावलकर साहेब, बीड जिल्हा वकील संघांचे अध्यक्ष ॲड. रोहिदास येवले, सचिव ॲड. यासेर पटेल, क्रिकेट कोच ॲड. राजन साळवी, उपाध्यक्ष ॲड. नितीन वाघमारे, उपाध्यक्ष ॲड. अविनाश गडगे, सहसचिव ॲड. श्रीकांत जाधव, ॲड. प्रशांत देशपांडे, महिला प्रतिनिधी ॲड. छाया वाघमारे, कोच आझर सर, कोच संजय धस, ॲड. प्रशांत जाधव, बीड जिल्हा वकील क्रिकेट संघांचे कर्णधार ॲड. साजेद सय्यद, उपकर्णधार ॲड. राहुल वाडमारे, ॲड. रंजीत वाघमारे, ॲड. सुशीम वाडमारे, ॲड. फिरोज पठाण, ॲड. सचिन काळकुटे, ॲड. शैलेश जाधव, ॲड. सिद्धार्थ उजगरे, ॲड. बाळासाहेब मगर, ॲड. आगे, ॲड. पोपळे, तसेच बीड जिल्हा वकील संघ क्रिकेट टीमचे सदस्य तसेच वकील महिला क्रिकेट संघाचे सदस्य उपस्थित होते.

## डाकपालने मारला पैशांवर डल्ला,सहा महिन्यांची शिक्षा

### आष्टी न्यायालयाचा निकाल

आष्टी तालुक्यातील खडकत येथील पोष्ट कार्यालयाचे डाकपाल आरोपी कांतीलाल अजिनाथ खरात यांना आष्टी न्यायालयाने पोष्टातील बँकेच्या पैशाचा अपहार केल्याबद्दल सहा महिन्याचा साधा करावास तसेच द्रवदंड रक्कम रुपये १००० तसेच दंड भरण्यास कसूर केला तर आरोपीने पंधरा दिवस साधी कैद ही शिक्षा भोगावी असा आदेश आरोपी विरुद्ध देण्यात आला आहे. मौजे खडकत ता.आष्टी जि.बीड येथील पोष्ट कार्यालयामधील डाकपाल कांतीलाल अजिनाथ खरात हा दिनांक १४ जुलै २००३ ते २४ नोव्हेंबर २००३ या काळात डाकपाल म्हणून नौकरी करीत असताना त्याने बँकेचे खातेदार यांचे आर.डी. चे पैसे भरल्याची नोंद फक्त पासबुकात केली व सही शिक्के मारले, परंतु रक्कम रुपये ९२४४/- कॅश बुक मध्ये जमा न करता स्वतःच्या फायद्यासाठी वापरून एकूण रक्कम रुपये ९२४४/- चा अपहार केल्या प्रकरणी आरोपी कांतीलाल अजिनाथ खरात यास सहा महिन्याचा साधा करावास तसेच द्रवदंड रक्कम रुपये १०००/- द्रवदंड भरण्यास कसूर केला तर आरोपीने पंधरा दिवस साधी कैद ही शिक्षा भोगावी अशी शिक्षा आष्टी येथील मा.न्यायाधीश एम. के. पाटील यांनी सुनावली तपासण्यात आले असून आरोपी विरुद्ध भा.दं. वि. कलम ४०९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सरकारी वकील ऍड चंद्रकांत अ. जावळे यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीस शिक्षा सुनवण्यात आली असून सरकारी पक्षा तर्फे ऍड चंद्रकांत अ. जावळे यांनी काम पहिले. त्यांना पैरवी अधिकारी म.पो.ह.छाया साप्ते यांनी काम पहिल

# १ आणि २ फेब्रुवारी रोजी होणार अंबाजोगाईत मराठी गझल समेलन

## दुसरे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल समेलनाच्या स्वागताध्यक्षपदी दगडू लोमटे

दुसरे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी येथील प्रसिद्ध साहित्यिक दगडू लोमटे यांची निवड करण्यात आली आहे. अंबाजोगाई येथे हे दुसरे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल संमेलन दि.१ व २ फेब्रुवारी रोजी योगेश्वरी महाविद्यालयाच्या नागापुरकर सभागृहात होणार आहे. महाराष्ट्र भरातून तीनशे गझलकार या गझल संमेलनासाठी उपस्थित राहणार आहेत. अंबाजोगाई येथील साधना सेवाभावी संस्था यांच्या वतीने अंबाजोगाईत दि. १ व २ फेब्रुवारी रोजी दुसरे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल संमेलन होणार आहे. या निमित्ताने झालेल्या बैठकीत स्वागत समितीची निवड करण्यात आली. यात स्वागताध्यक्ष म्हणून दगडू लोमटे, कार्याध्यक्ष डॉ.शुभदा लोहिया (राठी), उपाध्यक्ष निशा चौसाळकर, प्रा.मुकुंद राजपंखे, प्रा.शैलजा बरूरे, विद्याधर पांडे, शशिकला घोडके, सचिव गोरख शेंद्रे, सहसचिव दिवाकर जोशी, डॉ.राहुल धाकडे, कोषाध्यक्ष सुनिल जाधव तर स्वागत समिती सदस्य म्हणून कमलाकरराव चौसाळकर,



ॲड.अनंतराव जगतकर, अनिकेत लोहिया, डॉ. नरेंद्र काळे, राजपाल लोमटे, बिपिन क्षीरसागर, महेश लोमटे, कल्याण काळे, डॉ. नवनाथ घुगे, लक्ष्मण टाक, एस.बी.सय्यद, संजय सुराणा, ॲड.जयंत भारजकर, अविनाश मुडेगावकर, खाजाभाई यांची स्वागत समितीवर निवड करण्यात आली आहे. यापुर्वीचे पहिले गझल संमेलन अमळनेर येथे सन २०२३ साली झाले होते. या संमेलनात दुसरे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल संमेलन अंबाजोगाईत घेण्याची घोषणा करण्यात आली होती. त्या घोषणेनूसार साधना सेवाभावी संस्थेने या गझल संमेलनाचे पालकत्व स्विकारले. व अंबाजोगाईकरांच्या वतीने हे गझल संमेलन होणार आहे. सन १९८३ साली अंबाजोगाईत झालेल्या ५७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रसिद्ध गझलकार सुरेश भट यांच्या गझल सादरीकरणाचा पहिला अभिनव उपक्रम अंबाजोगाईतच झाला होता. अंबाजोगाईच्या साहित्य संमेलनात प्रथमच गझलेला अंबाजोगाईकरांनी बहुमान मिळवून दिला होता. त्याच धर्तीवर आता हे गझल संमेलन अंबाजोगाईत आद्यकवींच्या भूमित होत आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com